# उपवनसंरक्षक, औरंगाबाद वनविभाग, औरंगाबाद यांचे कार्यालय.

विषयः-मागासवर्गीयांचे अनुशेषांतर्गत
वनरक्षक पदावर नियुक्ती देणे
बाबत...

जा.क्र.ब/१२/आस्था/अनु/१४८९/सन ०४.०५
औरंगाबाद. ४३१ ००५ दिनांक १९/८/२००४ २१

आदेशः

संदर्भः- १) जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांचे जा.क्र.२००४/पुनर्वसन/आस्था/ कावि-१८०,दिनांक २३/२/०४
२)सामान्यप्रशासन विभाग,परिपत्रक क्र.संकीर्ण१००३/प्र.क्र.१६/२००३/ १३-ब/दिनांक १९/११/२००३.
३) शासन परिपत्रक क्र प्रनिम/१०९३/प्र.क्र.९४/१३-अ दिनांक११/८/१९९३
४) शासन निर्णय क्र. बीसीसी-१०९३/प्र.क्र.१६०/९३/१६-ब,दि.२२/११/९३.
५)मुख्य वनसंरक्षक(प्रा)औरंगाबाद यांचे आदेश क्र कक्ष-२/१२/आस्था/ प्र.क्र.३०/०३-०४/४६७,दिनांक २९-५-२००४

शासनाचे प्रचलीत धोरणानुसार मागासवर्गीयांच्या अनुशेषांतर्गत वनरक्षकांची पदे भरण्यासाठी शासन निर्णय क्रमांक सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२००३/प्र.क्र.३/९२,दिनांक १-८-२००३ व दिनांक २ डिसेंबर-२००३ मधील सूचना तसेच जिल्हाधिकारी यांचे जा.क्र.२००३/मशाका-१/आस्था-१/कावि,दिनांक ६-१२-२००३ अन्वये दिलेल्या सुचनानुसार उपरोक्त संदर्भ क्रमांक१अन्वये यादया प्राप्त झाल्या होत्या.

सदर उमेदवारांची सदरचे पदासाठी आवश्यक असलेली शारीरीक शैक्षणीक पात्रता,वयोमर्यादा,जात व प्रवर्ग इत्यादि तपासण्यात येवून चालण्याची चाचणी देखील घेण्यात आली होती व त्यात पात्र ठरलेल्या उमेदवारांची जिल्हा निवड समितीमार्फत मुलाखत घेण्यात आली असून त्यात ते पात्र ठरले आहेत.

महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय,सांस्कृतीक कार्य,क्रिडा व विशेष सहाय्य विभाग,शासन निर्णय क्रमांक सीबीसी-१०/२००३/प्र.क्र.९१/मावक-५,दिनांक ८डिसेंबर-२००३ नुसार सदर राखीव प्रवर्गाचे उमेदवारांचे जातीच्या प्रमाणपत्रांची वैद्यता पडताळणी होणे आवश्यक असल्याने या कार्यालयाचे जा.क्र.ब/१२/आस्था/अनु/१३६३,दिनांक१२/८/२००४ अन्वये सदस्य सचिव,आदिवासी जातपडताळणी विभाग,औरंगाबाद/ विभागीय समाजकल्याण अधिकारी,औरंगाबाद यांचेकडे पाठविण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी सदर उमेदवाराचे दिलेल्या राखीव प्रवर्गाचे(अनूसूचीत जमाती) वैद्यता प्रमाणपत्रानुसार त्यांना खालील अटींचे अधिन राहून तात्पूरत्या स्वरुपी वनरक्षक या पदावर नियुक्ती देण्यात येत आहे.

१. वनरक्षक पदाची वेतनश्रेणी :-रु २७५०-७०-३८००-७५-४४००/-अशी राहील.

२.  जिल्हाधिकारी,औरंगाबाद व जालना यांचेकडील पूनर्वसन,अंशकालीन व अनुकंपा विभागाकडून अनूसूचीत जमातीचे पुरेशे उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे उपरोक्त संदर्भ क्रमांक २ चे शासन निर्णयाचे तरतुदीनुसार दै देवगिरी तरुण भारत व दैनिक लोकपत्रमध्ये दिलेल्या जाहिरातीनुसार तसेच आदिवासी विकास विभाग,औरंगाबाद यांचेकडून प्राप्त यादी तसेच प्राप्त झालेल्या अर्जातील उमेदवरामधुन निवड झालेली आहे.

३.  आपण या कार्यालयास जो साक्षांकन नमुना सादर केलेला आहे त्यामध्ये त्यांचे विरुध्द त्यांचे नोकरीस हानीकारक ठरेल अशी कोणतीही माहिती दडवून ठेवलेली नसल्याबाबत प्रमाणित केलेले आहे. यातील कोणतीही बाब भविष्यात खोटी ठरल्यास आपण कार्यवाहीस(नोकरीतून कमी करण्यास)पात्र राहाल याची आपणास जाणीव आहे.

४.  आपली नेमणूक ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपी राहील. सदरची नेमणूक ही हंगामी स्वरुपी असल्याने त्यांना केव्हाही कोणतीही पूर्वसूचना न देता कमी करणेत येईल.व तसे मान्य असल्याबाबत लेखी निवेदन त्यांनी हजर होण्यापूर्वी दाखल करणे आवश्यक आहे.

५.  तसेच शासनाने वेळोवेळी घेतलेले कोणतेही निर्णय हे त्यांचेवर बंधनकारक राहातील.

६.  शासन सेवेत रुजू झालेनंतर खात्यामार्फत आपली निवड वनरक्षक प्रशिक्षणासाठी ज्यावेळी करणेत येईल त्यावेळी सदरचे प्रशिक्षण पूर्ण करणे बंधनकारक राहील.

७  मुख्यवनसंरक्षक(प्रा)औरंगाबाद यांचे उपरोक्त संदर्भ क्रमांक ५ चे आदेशान्वये दिलेल्या सुचनानुसार आपली नियुक्ती नंतरची पदस्थापना ही उपवनसंरक्षक (वन्यजिव)औरंगाबाद या विभागात वनरक्षक हिवरखेडा,वनक्षेत्र कन्नड येथे श्री.पी.एन.पटेल याचे बदलीमुळे रिक्त झालेल्या पदावर करण्यात आलेली असल्याने आपण सदरचे ठिकाणी नियुक्ती आदेश प्राप्त होताच आपले पदस्थापनेच्या ठिकाणी वन्यजिव विभागात रुजू व्हावे.तसेच सदर ठिकाणी हजर होतांना चांगल्या वर्तणूकीबाबतचे दोन प्रतिष्ठित व्यक्तींचे प्रमाणपत्र तसेच शैक्षणीक व इतर कागदपत्र सादर करणे आवश्यक राहील.

उपवनसंरक्षक,
औरंगाबाद वनविभाग,औरंगाबाद

प्रति,
श्री.पारधी प्रवीण जनार्दन,मु.पो.चिनार गार्डन
प्लॅट नं.सी-१५नागपालग्रूप ,पडेगांव,औ.बाद.

**प्रतिलिपी:**-उपवनसंरक्षक(वन्यजिव)रोपळेकर हॉस्पीटल समोर,टिळकनगर,औ.बाद यांना जा.क्र.अ/१२/आस्था/२३५,दिनांक२२/७/२००४ चे संदर्भात माहितीस्तव सस्नेह अग्रेषित

**प्रतिलिपी:**-जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांना त्यांचे उपरोक्त संदर्भाचे अनुशंगाने माहितीस्तव सस्नेह अग्रेषित.

**प्रतिलिपी:** मा.मुख्यवनसंरक्षक प्रा,औरंगाबाद यांना त्यांचे उपरोक्त संदर्भ क्रमांक ५ चे अनुशंगाने माहितीस्तव सादर.